**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**बुधवार  दिनांक ७ ऑक्टोबर २०२६**

**ठळक बातम्या....**

**1. जनतेचा विश्वास आणि कोट्यवधी कार्यकर्त्यांचा समर्पणभाव हीच आपली मोठी ऊर्जा असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन**

**2. भारतीय रिझर्व्ह बँकेची रेपो दरात पाव टक्के वाढ; दर साडेपाच टक्क्यांवर**

**3. नीती आयोगाच्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमांतर्गत डेल्टा रँकिंगमध्ये गडचिरोली जिल्हा देशात प्रथम**

**4. स्मृती मानधना भारतीय महिला क्रिकेट संघाची नवी कर्णधार**

---

**मोदी २५ वर्ष पूर्ण**

जनतेचा विश्वास आणि पक्षाच्या  कोट्यावधी कार्यकर्त्यांचा समर्पणभाव हीच आपली मोठी ऊर्जा असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्याला आज २५ वर्षे पूर्ण झाली. तेव्हापासून आधी राज्य सरकारचे आणि त्यानंतर केंद्रसरकारचे प्रमुख म्हणून ते गेली सलग २५ वर्षे कार्यरत आहेत. यानिमीत्तानं आज नवी दिल्ली इथं झालेल्या विकसित भारत संकल्प सभेला त्यांनी संबोधित केलं. सरकार प्रमुख म्हणून गेल्या २५ वर्षांत कमावलेला जनतेचा विश्वास आणि या काळात आलेला अनुभव हीच आपली मोठी संपत्ती असल्याचं त्यांनी सांगितलं.-

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी २८ सेकंद)***

देश आणि १४० कोटी देशवासियांच्या कल्याणासाठी, अहोरात्र  संपूर्ण निष्ठेनं लोकांची सेवा करण्यासाठी आपल्याला अधिक बळ आणि ऊर्जा मिळावी, अशी प्रार्थना आज ईश्वराकडे केल्याचं त्यांनी सांगितलं.  आज भारत आपलं वाढतं सामर्थ्य आणि लवचिकतेसाठी ओळखला जात असल्याचं ते म्हणाले. गेल्या १२ वर्षांत देशाची परिस्थिती पूर्णपणे बदलली असून, आता भारत निर्यातीत नवे विक्रम रचत आहे, आज मेड इन इंडिया मोबाईल फोन्सनी जागतिक बाजारपेठ व्यापली आहे, कृषी क्षेत्रातही सर्वोच्च आणि शाश्वत वाढ झाली आहे असं ते म्हणाले. भारताच्या उभारणीसाठी मोठी ध्येय बाळगण्याची हीच योग्य वेळ आहे असं ते म्हणाले.७ ऑक्टोबर २००१ ला आपण गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती, त्यावेळी या टप्प्यापर्यंत पोहचू असा विचार केला नव्हता, मात्र जनतेच्या आशीर्वादानं आणि पाठिंब्यानंच हे शक्य झालं

अशी भावना त्यांनी व्यक्त केली. याबद्दल त्यांनी देशवासियांचे, भाजपा आणि लोकशाहीवर श्रद्धा असलेल्या सर्व राजकीय सहकाऱ्यांचे आभार मानले. यावेळी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी पंतप्रधानांचं अभिनंदन केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनसेवेलाच आपल्या आयुष्याचं एकमेव उद्दिष्ट मानलं, त्यांनी राजकारणाकडे राष्ट्रसेवेचं माध्यम म्हणून पाहिलं अशा शब्दांत त्यांनी मोदींचा गौरव केला.

-----------------------------------------------

**रिझर्व्ह बँक**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं  आज रेपो दरात पाव टक्के वाढ केली असून तो साडेपाच टक्के झाला आहे. रिझर्व्ह बँकेची द्वैमासिक पतधोरण आढावा बैठक मुंबईत झाली. जागतिक अनिश्चिततेच्या वातावरणात चलनफुगवट्यावर नियंत्रण आणण्याच्या उद्देशानं  हा निर्णय घेतला असल्याचं गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी वार्ताहरांना सांगितलं.    बँकेनं रेपो दरात यापूर्वी  फेब्रुवारी २०२३ मध्ये वाढ केली होती. ऑगस्ट महिन्यात ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित चलन फुगवट्याचा दर ४ पूर्णांक ८२ शतांश टक्क्यांवर पोहोचला; त्या आधी जुलै महिन्यात हा दर ४ पूर्णांक ४५ शतांश टक्के इतका होता. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीचा जीडीपी वाढीचा सुधारित अंदाजही आरबीआयनं  जाहीर केला आहे. हा दर ६ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांनी वाढून ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहिल्याचं मल्होत्रा म्हणाले. तर चालू आर्थिक वर्षात चलन फुगवट्याचा दर ५ टक्क्यांवरून वाढून ५ पूर्णांक २ दशांश टक्के राहील असा अंदाज आरबीआयनं  वर्तवला आहे.

-----------------------------------------------

**सेवा संकल्प - राम मंदिर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला आज २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे पंतप्रधान म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७ च्या दिशेनं   होत आहे. सर्वसमावेशक विकास, सामाजिक सक्षमीकरण, आणि समर्पण भावाचा हा प्रवास सर्वसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. या अंतर्गत  विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहोत राम मंदिर उभारण्याबद्दल.....

***व्हॉइस कास्ट - समृद्धी शेणमारे***

***पाच शतकांपासून हिंदू समाज अयोध्येतील प्रभू श्रीरामांच्या जन्मभूमीवर मंदिर उभारण्याची प्रतीक्षा करत होता. अयोध्या हे केवळ एक धार्मिक स्थळ नव्हतं, तर कोट्यवधी लोकांच्या श्रद्धेचं केंद्र होतं. या प्रकरणावर सुमारे सत्तर वर्षे न्यायालयीन***

*प्रक्रिया सुरू होती. नोव्हेंबर २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयानं एकमतानं निकाल देत मंदिरासाठी ही जागा देण्याचा निर्णय दिला. या निर्णयानंतर देशभरात शांतता कायम राहिली आणि कोणताही हिंसाचार झाला नाही. २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला. नोव्हेंबर २०२५ मध्ये ध्वजारोहणासह मंदिराच बांधकाम पूर्ण झाल. पाचशे वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अयोध्येच्या पवित्र भूमीत प्रभू श्रीरामांचं मंदिर साकारलं गेलं आणि एका दीर्घ सांस्कृतिक आकांक्षेला मूर्त रूप मिळालं.*

---------------------------------------------------

**सेवा संकल्प यात्रा नागपुर**

सेवा संकल्प यात्रेचा समारोप आज नागपुरातील गांधीसागर येथील शिक्षक सहकारी बँक सभागृहात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मंत्री आशिष शेलार, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रविण दटके, भाजप शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी, यासह नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित होते. यावेळेला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते दिव्यांग खेळाडू आणि भाजपच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदींचं संबोधन ऐकण्यासाठी ऑनलाइन व्यवस्था करण्यात आली होती.

---------------------------------------------------

**एमपीएसी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याशिवाय आंदोलनातून माघार घेणार नाही, अशी भूमिका आमदार रोहित पवार यांनी आज पुण्यात मांडली. मुंबई उच्च न्यायालयानं आंदोलनाबाबत नोंदवलेल्या निरीक्षणानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. एस. एम. जोशी पुलावरील आंदोलन सुरू ठेवण्यावर ते ठाम आहेत. दरम्यान, पुण्यातील टिळक चौकातील एमपीएससी विद्यार्थ्यांचं आंदोलन स्थगित करण्यात आलं आहे. मुंबई उच्च न्यायालयानं आज विद्यार्थ्यांना आंदोलनाचा अधिकार असल्याचं स्पष्ट करत अभ्यासाकडे परतण्याचा सल्ला दिला. परीक्षा निष्पक्ष आणि पारदर्शक होतील, याची हमी देऊन विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करण्याचे निर्देश न्यायालयानं राज्य सरकारला दिले. भरती प्रक्रिया कशी राबवणार, याचा आराखडा तीन आठवड्यांत सादर करण्यासही न्यायालयानं सांगितलं आहे.

---------------------------------------------------

**चंद्रशेखर बावनकुळे**

इतर मागास बहुजन समाजातल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी वसतिगृह, स्वाधार योजना, शिष्यवृत्ती आणि महाज्योतीच्या विविध उपक्रमांना अधिक बळकटी देऊन त्यांच्या अंमलबजावणीला गती देण्याचे निर्देश इतर

मागासवर्ग मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. काल मुंबईत झालेल्या समितीच्या बैठकीत ओबीसी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. मराठा समाजासाठी नेमण्यात आलेल्या शिंदे समितीप्रमाणेच विमुक्त जाती आणि भटक्या जमातींच्या समस्यांचा अभ्यास करून अहवाल सादरण्यासाठी समिती नेमण्याबाबत प्रस्ताव तयार करण्याची सूचनाही यावेळी करण्यात आली.

---------------------------------------------------

**नीती आयोग**

गडचिरोली जिल्ह्यानं नीती आयोगाच्या आकांक्षित जिल्हे कार्यक्रमांतर्गत एप्रिल ते जून २०२६ या तिमाहीच्या एकूण डेल्टा रँकिंगमध्ये देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. कृषी आणि जलसंपदा क्षेत्रातही जिल्ह्यानं देशात अव्वल स्थान पटकावलं आहे.आरोग्य आणि पोषण, शिक्षण, कृषी आणि जलसंपदा, आर्थिक समावेशन आणि कौशल्य विकास तसच मूलभूत पायाभूत सुविधा या पाच क्षेत्रांतील ४८ निर्देशांकांमध्ये झालेल्या सुधारणांच्या आधारे हे रँकिंग निश्चित करण्यात आलं आहे.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा प्रशासन, अधिकारी-कर्मचारी, सामाजिक संस्था, उद्योजक आणि नागरिकांचं अभिनंदन केलं आहे. सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनीही जिल्हा प्रशासनाचं कौतुक केलं आहे.

---------------------------------------------------

**स्फोटक साहित्य जप्त**

महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील कोपर्शी जंगल परिसरात माओवाद्यांनी जमिनीत पुरून ठेवलेली सहा अग्निशस्त्रे आणि स्फोटक साहित्य गडचिरोली पोलिसांनी जप्त केलं. गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली काल विशेष अभियान पथक आणि बीडीडीएस पथकाने ही कारवाई केली. यामध्ये एक पॉईंट ३०३ रायफल, दोन सिंगल शॉट रायफल, दोन गावठी पिस्तूल आणि एक बीजीएल लाँचर, दहा बीजीएल सेल, २१ जिवंत काडतुसे, सात डेटोनेटर आणि १५० मीटर केबल वायर जप्त करण्यात आली.

---------------------------------------------------

**परिणय फुके**

राहुल गांधी यांनी काल केलेलं आंदोलन हे देशाला आंतरराष्ट्रीय स्तरावर बदनाम करण्यासाठी आखण्यात आले असल्याचा आरोप भाजप नेते परिणय फुके यांनी नागपुरात पत्रकारांशी बोलताना केला. भारत सध्या विविध क्षेत्रांत प्रगती करत असून, देशात येणारी विदेशी गुंतवणूक रोखण्यासाठी आणि भारताची आंतरराष्ट्रीय स्तरावर

बदनामी करण्यासाठीच हे आंदोलन करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. राहुल गांधी जनतेची दिशाभूल करत असल्याचं फुके यांनी म्हटलं आहे.

-----------------------------------------------

**ऑनलाइन अर्ज**

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेसाठी लवकरच ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणार असून त्यासाठी शासनानं कोणत्याही अशासकीय व्यक्ती अथवा संस्थाना प्राधिकृत केलेलं नाही. यासंदर्भात समाज माध्यमांवर प्रसारित होत असलेल्या चुकीच्या जाहिरातीना बळी पडू नये. तसच अर्जदारास अर्ज भरताना काही अडचण/शंका असल्यास नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखाने, कार्यालय किंवा 1962 या टोल फ्रि नंबरवर संपर्क साधावा, असं आवाहन पशुसंवर्धन विभागाच्या वतीनं करण्यात आलं आहे.

-----------------------------------------------

**नोबेल पुरस्कार**

यंदाचा भौतिकशास्त्रातला नोबेल पुरस्कार फ्रान्सिस हालझेन यांना जाहीर झाला आहे. बेल्जियममध्ये जन्माला आलेले हालझेन अमेरिकेच्या विस्कॉन्सिन विद्यापीठात कार्यरत आहेत. आइस क्युब न्युट्रिनो वेधशाळा आणि उच्च ऊर्जा क्षमता असलेल्या न्यूट्रिनोंच्या शोधासाठी त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला.

-----------------------------------------------

**स्मृती मानधना**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं अनुभवी फलंदाज स्मृती मानधनाची भारतीय महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती केली आहे. सर्व फॉरमॅटमध्ये संघासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या स्मृतीने देशांतर्गत तसच फ्रँचायझी क्रिकेटमध्येही नेतृत्वाची छाप पाडली आहे.तिने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला २०२४ आणि २०२६ मध्ये महिला प्रीमियर लीगचे विजेतेपद मिळवून दिले आहे.कर्णधारपदाची जबाबदारी मिळणे हा विशेष सन्मान असल्याचं सांगत स्मृतीने माजी कर्णधार हरमनप्रीत कौरच्या योगदानाचंही कौतुक केलं.

-----------------------------------------------